५४ (३२)

राज्यात क्रीडा विद्यापीठ स्थापन करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,
शासन निर्णय क्र.शाक्रीम १०९५/प्र.क्र.१६६/क्रीयुसे-३;
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक. १८ नोव्हेंबर, १९९५

पहा :-[१] शासन निर्णय,समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,
क्र.शाक्रीम १०९१/सुमंत १७५०/१९०८/१८०/क्रीयुसे-३,
दिनांक २५ मार्च, १९९५
[२] शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग
क्र.शाक्रीम १०९१/सुमंत १७५०/१९०८/१८०/क्रीयुसे-३,
दिनांक ३ मे १९९५

प्रस्तावना :- राज्यात शारिरीक शिक्षण व क्रीडा यांचा कार्य उंचावण्यासाठी राज्यस्तरावर क्रीडा विद्यापीठ स्थापन करावे अशा प्रकारची मागणी गेल्या काही वर्षांपासून क्रीडा क्षेत्रातील अनेक क्रीडा प्रेमी आणि तज्ञांकडून करण्यात येत होती. या संदर्भात शासनाने उपरोक्त नमूद केलेल्या शासन निर्णयान्वये या विषयाबाबत सखोल अभ्यास करण्याकरिता तज्ञांची समिती स्थापन केली होती. या समितीने आपला अहवाल शासनास सादर केला असून तो शासनाने तत्वत: मान्य केला आहे.

शासन निर्णय:= शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, राज्यात क्रीडा विद्यापीठ स्थापन करण्याचा पहिला टप्पा म्हणून पुणे येथील शिवछत्रपती क्रीडानगरी येथे मध्यवर्ती क्रीडा केंद्र व राज्यातील वेगवेगळ्या १४ ठिकाणी क्रीडा प्रबोधिनी खाली नमूद केल्याप्रमाणे स्थापन करण्यात येतील.

| अनु.क्र. | प्रबोधिनीचे ठिकाण | सुचविलेले क्रीडा प्रकार | अंदाजे प्रशिक्षणार्थी |
|---|---|---|---|
| [१] | पुणे [प्रबोधिनीतह शाळा] | [१] ॲथलेटिक्स | .. २५ मुले-मुली |
| | | [२] जिम्नॅस्टिक्स | .. २५ मुले-मुली |
| | | [३] जलतरण | .. २० मुले-मुली |
| | | [४] वॉटरपोलो | .. २० मुले-मुली |
| | | [५] बास्केटबॉल | .. ४० मुले-मुली |
| | | [६] कुस्ती | .. ३० मुले |

...२

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| [२] पिंपरी-चिंचवड | [१] हॉकी [कृत्रीम मैदान] | ..६० मुले-मुली |
| | [२] मल्लखांब | ..२५ मुले-मुली |
| [३] सांगली | [१] ज्युदो | ..२० मुले-मुली |
| | [२] वेटलिफटींग | ..२० मुले-मुली |
| [४] कोल्हापूर | [१] कुस्ती | ..४० मुले |
| | [२] शूटींग | ..२० मुले-मुली |
| | [३] फूटबॉल | ..३० मुले-मुली |
| [५] मुंबई | [१] जलतरण | ..२५ मुले-मुली |
| | [२] शूटींग | ;;२५ मुले-मुली |
| | [३] हॉकी | ..६० मुले-मुली |
| | [४] अॅथलेटिक्स | ..२० मुले-मुली |
| | [५] मल्लखांब | ..१५ मुले-मुली |
| | x [६] याटींग | |
| [६] नवी मुंबई | [१] फूटबॉल | ..३० मुले-मुली |
| | [२] जलतरण | ..२० मुले-मुली |
| [७] ठाणे | [१] अॅथलेटिक्स | ..२५ मुले-मुली |
| | [२] बॅडमिंटन | ..२५ मुले-मुली |
| [८] नाशिक | [१] टेबलटेनिस | ..२५ मुले-मुली |
| | [२] जलतरण [डाईव्हिंग] | ..२५ मुले-मुली |
| [९] धुळे | [१] कबड्डी किंवा खो खो | ..४० मुले-मुली |
| [१०] अमरावती | [१] ज्युदो | ..३० मुले-मुली |
| | [२] बास्केटबॉल | ..४० मुले-मुली |
| | [३] मल्लखांब | ..२० मुले-मुली |
| | [४] अॅथलेटिक्स् | ..२५ मुले-मुली |
| | [५] धनुर्विद्या [मेळघाट] | ..२० मुले-मुली |
| [११] नागपूर | [१] अॅथलेटिक्स् [लांब पल्ला] | २० मुले-मुली |
| | [२] हॅण्डबॉल | ..४० मुले-मुली |
| | [३] खो खो | ..४० मुले-मुली |
| [१२] औरंगाबाद | [१] जिम्नॅस्टिक्स् | ..३० मुले-मुली |
| | [२] व्हॉलीबॉल | ..४० मुले-मुली |
| | [३] हॉकी | ..४० मुले-मुली |

...३

2/५/७

| | | |
|---|---|---|
| [१३] रत्नागिरी | [१] मल्लखांब | .. ३० मुले-मुली |
| | [२] अॅथेलेटिक्स् | .. ३० मुले-मुली |
| [१४] रायगड | [१] जलतरण | .. ३५ मुले-मुली |
| | [२] कबड्डी | .. ४८ मुले-मुली |

× गेले काही वर्षे कार्यरत असलेले मुंबईतील नौदलाच्या यार्टिंग केंद्रात हा उपक्रम राबविला जाईल.

२. तसेच चालू वर्षी वर नमूद केल्याप्रमाणे क्रीडा प्रकार व अंदाजे प्रशिक्षणार्थी याचिताह मध्यवर्ती क्रीडा केंद्र पुणे येथे आणि क्रीडा प्रबोधिनी

१] पुणे

२] नागपूर

३] अमरावती

४] संभाजीनगर

५] नाशिक

६] कोल्हापूर

७] मुंबई

या ठिकाणी दिनांक १-१-९६ पासून सुरु करण्यात येतील.

३. परिशिष्ट "अ" मध्ये दर्शविल्याप्रमाणे चालू आणि पुढील ४ आर्थिक वर्षांकरिता करावयाच्या अंदाजे रु.११३.९५ कोटी खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

४. मध्यवर्ती केंद्र आणि क्रीडा प्रबोधिनी यांची रचना तसेच धोरण समिती आणि प्रशिक्षणार्थी [बॅटरी ऑफ टेस्टसुध्दारा] यांचा तपशिल परिशिष्ट "ब" मध्ये दर्शविल्याप्रमाणे असेल.

५. मध्यवर्ती केंद्र व प्रबोधिनी यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी एक उच्चस्तरीय धोरण समितीची स्थापना करण्यात येत आहे. समितीचे सदस्य पुढीलप्रमाणे असतील :-

| | | |
|---|---|---|
| [१] मुख्यमंत्री | .. .. | प्रमुख आश्रयदाते |
| [२] मंत्री [ क्रीडा ] | .. .. | आश्रयदाते |
| [३] राज्यमंत्री [क्रीडा] | .. | आश्रयदाते |
| [४] सचिव, [क्रीडा] महाराष्ट्र शासन | | कार्यकारी [दसिदध] अध्यक्ष |

;;;४

[५] विभागीय आयुक्त, पुणे .. .. सदस्य

[६] महानगर पालिका आयुक्त, पुणे .. .. सदस्य

[७] संचालक, क्रीडा व युवकसेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य .. सदस्य

[८] क्रीडा प्रबोधिनीचे पाच प्राचार्य [ दर २ वर्षांनी क्रमाक्रमाने ] .. सदस्य

[९] विभागीय संचालक [भारतीय क्रीडा प्राधिकरण] .. सदस्य

[१०] राज्य एकविध खेळ संघटनांचे प्रतिनिधी [मध्यवर्ती केंद्रात निवडलेल्या खेळांपैकी दोन खेळांचे प्रतिनिधी] दर दोन वर्षानंतर क्रमाक्रमाने. .. सदस्य

[११] द्रोणाचार्य/अर्जुन पुरस्कार/दादोजी कोंडदेव पुरस्कार विजेते [यांची नियुक्ती शासन करेल, यांचे ३ प्रतिनिधी असतील, त्यापैकी १ महिला प्रतिनिधी असेल] दर दोन वर्षांनी .. सदस्य

[१२] शासनाने नियुक्त केलेले क्रीडा क्षेत्रातील तीन तज्ञ .. सदस्य

[१३] मराठा चेंबर ऑफ कॉमर्स यांचे प्रतिनिधी [ दर दोन वर्षांनी क्रमाक्रमाने ] .. सदस्य

[१४] केंद्र प्रमुख मध्यवर्ती केंद्र .. समिती सचिव

वरील समितीवरील अशासकीय सदस्यांची नेमणूक होईपर्यंत समितीचे इतर सदस्य समितीचे कामकाज पहातील.

समितीची किमान दर तीन महिन्यांनी किंवा आवश्यकतेनुसार सभा आयोजित केली जाईल व या समितीचे घेतलेल्या निर्णयावर अंमलबजावणी करण्याचे कार्य समितीचे सचिव म्हणून केंद्र प्रमुख मध्यवर्ती केंद्र यांचे राहील.



Scanned by CamScanner

६. उच्चस्तरीय धोरण समिती गठीत केल्यामुळे श्री. शिवछत्रपती क्रीडा नगरी, पुणे करिता दैनंदिन व्यवस्थापन पहाण्यासाठी शासन निर्णय क्र.पीएचई १०९०/प्र.क्र.२९७/क्रीयुसे-१, दिनांक १६ जून १९९५ अन्वये गठीत करण्यात आलेली तदर्थ समिती विस्थापित करण्यात येत आहे.

७. क्रीडा विद्यापीठ समितीने केलेल्या शिफारशींना तत्वत: मान्यता देण्यात येत आहे.

मात्र परिशिष्ट "क" मध्ये दर्शविलेल्या बाबींवर संबंधित विभागांनी अंतिम निर्णय प्राप्त करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करावी व आवश्यक असल्यास मंत्रिमंडळाची मान्यता घ्यावी.

सदरचा शासन निर्णय नियोजन विभाग आणि वित्त विभाग यांच्या क्र. प्र.क्र. ८०४/९५/व्यय - ११ दि. ३/११/९५ अन्वये दिलेल्या संमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ र.श्री. राठोड ] 9/11/95

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति

संचालक, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे

उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा, मुंबई/नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद, नागपूर, पुणे.

सर्व जिल्हाधिकारी व अध्यक्ष जिल्हा क्रीडा परिषद

सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी

महालेखापाल, महाराष्ट्र-१ [लेखा व अनुज्ञेयता], मुंबई

महालेखापाल, महाराष्ट्र-१ [लेखा व परिरक्षण] मुंबई

महालेखापाल, महाराष्ट्र-२ [लेखा व अनुज्ञेयता] नागपूर

महालेखापाल, महाराष्ट्र-२ [लेखा व परिरक्षण ]; नागपूर

अधिदान व लेखाधिकारी, मुंबई

निवासी लेखा अधिकारी, मुंबई

जिल्हा कोषाधिकारी, पुणे

वित्त विभाग, व्यय-११

सर्व मंत्रालयीन विभाग

सर्व विभागीय आयुक्त

सर्व पालिका आयुक्त
मा. राज्यमंत्री [क्रीडा] यांचे खाजगी सचिव
मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा. पालकमंत्री [सर्व जिल्हे]

निवड नस्ती. कार्यासन – क्रीयुसे–३

Scanned by CamScanner

परिशिष्ट " अ "

मध्यवर्ती केंद्र व प्रबोधिनींसाठी येत्या पांच वर्षांच्या खर्चाचा तपशील [रुपये लाखात]

| | १ ले वर्ष [१९९५-९६] | २ रे वर्ष [१९९६-९७] | ३ रे वर्ष [१९९७-९८] | ४ थे वर्ष [१९९८-९९] | ५ वे वर्ष [१९९९-२०००] | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| **मध्यवर्ती केंद्र** | | | | | | |
| [ १ प्रबोधिनी व शालेतर] | | | | | | |
| अ] बांधकाम | – | ३६५.०० | १००.०० | २००.०० | ४००.०० | १०६५.०० |
| ब] प्रयोगशाळा व ग्रंथालय | ५०.०० | ६०.०० | ६०.०० | ६०.०० | २०.०० | २५०.०० |
| क] क्रीडा साहित्य व फर्निचर | १८०.०० | ३००.०० | २५०.०० | १५०.०० | ५०.०० | ९३०.०० |
| ड] वसतिगृह | – | ४५.०० | ४५.०० | ४५.०० | ४५.०० | १८०.०० |
| इ] प्रशिक्षण | – | १००.०० | १००.०० | १००.०० | १००.०० | ४००.०० |
| फ] प्रशासकीय | २००.०० | ३५०.०० | ३५०.०० | ३५०.०० | ३५०.०० | १[illegible].०० |
| ग] नॅशनल व एशियाड | १००.०० | १००.०० | १००.०० | १००.०० | १००.०० | ५००.०० |
| ] **प्रबोधिनी [१३]** | | | | | | |
| अ] बांधकाम | – | ३००.०० | ६००.०० | ६००.०० | ६००.०० | २१००.०० |
| ब] क्रीडा साहित्य | ५०.०० | २[illegible].०० | [illegible] | ४५०.०० | ४५०.०० | १५५०.०० |
| क] वसतिगृह | – | ३५०.०० | ४५०.०० | ५००.०० | ६००.०० | १९५०.०० |
| ड] प्रशिक्षण | – | १००.०० | १००.०० | २००.०० | २५०.०० | ६५०.०० |
| इ] प्रशासकीय | १०.०० | ५०.०० | ७०.०० | ७०.०० | ७०.०० | २७०.०० |
| एकूण | ५९०.[illegible] | २३७०.०० | २५७५.०० | २८२५.०० | ३०३५.०० | ११३९५.०० |
| आवर्ती | ३७५.०० | १०६५.०० | १२१५.०० | १३६५.०० | १४१५.०० | ५५३०.०० |
| अनावर्ती | २३६.०० | १३०५.[illegible] | १३६०.०० | १४६०.०० | १६२०.०० | ५८६५.०० |

परिशिष्ट " ब"

## संकल्पित क्रीडा प्रबोधिनीची रुपरेषा

१. क्रीडा क्षेत्रात वैज्ञानिक पध्दतीचा अवलंब करुन, खेळांची अद्यावत उपकरणे आणि प्रशिक्षण यावर अधिकाधिक प्रमाणात लक्ष केंद्रीत करण्याच्या धोरणाची सत्वर आणि प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी राज्यात विविध चौदा ठिकाणी क्रीडा प्रबोधिनी निर्माण करण्यात येतील.

२. ८ ते १४ १४ या वयोगटातील मुलामुलींची निवड करुन त्यांना ८ ते १० वर्ष प्रशिक्षणाद्वारे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू तयार करणे हे या क्रीडा प्रबोधिनीचे प्रमुख उद्दिष्ट राहील.

३. काही विशिष्ट खेळांच्या त्या त्या भागातील परंपरा लक्षात घेऊन राज्यात १४ वेगवेगळ्या ठिकाणी क्रीडा प्रबोधिनी निर्माण करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. या प्रबोधिनीचा संकल्पित आराखडा मुख्यत्वेकरुन उपलब्ध असलेल्या सोयीसुविधांचा जास्तीत जास्त उपयोग करुन घेण्याच्या दृष्टीकोनातून तयार करण्यात आला असून त्यात गरजेनुसार व उपलब्धतेनुसार बदल होऊ शकेल.

४. क्रीडा प्रबोधिनीच्या संकल्पित आराखडयात मुख्यत्वेकरुन खालील बाबींचा समावेश असेल.

४.१ वसतीगृह

प्रत्येक प्रबोधिनीत मुलामुलींसाठी साधारणतः ७० मुले व ३० मुली यांकरिता निवास व्यवस्था असावी. याबरोबरच भोजनगृह, स्वयंपाक खोली, करमणूक कक्ष [यात एम.आय. रुम आणि वाचनालय तसेच अभ्यागत कक्ष यांचा समावेश असेल] वसतीगृह प्रमुखासाठी [पुरुष/महिला ] रहाण्याची व्यवस्था तसेच प्रबोधिनी प्राचार्यांसाठी कार्यालय व निवासस्थान आदि सुविधा असेल. स्वयंपाकी व वाढपी यांच्या निवासस्थानासाठी डॉर्मिटरीची व्यवस्थाही करावी लागेल.

४.२ खेळांची मैदाने

प्रत्येक प्रबोधिनीमध्ये ४०० किंवा किमान २०० मीटर मातीचा धावनमार्ग असावा. त्याचबरोबर धावनमार्गाच्या मधील उपलब्ध जागेमध्ये फुटबॉल, बास्केटबॉल, व्हॉलीबॉल, हँडबॉल, कबड्डी, खो-खो यासाठी मैदाने उपलब्ध करुन देण्यात येतील. या शिवाय निवड केलेल्या विशिष्ट

[कृ.मा.प.

खेळासाठी मैदाने उपलब्ध करुन देण्यात यावीत. खेळाची प्रात्यक्षिक तोच वर्ग भरविण्यासाठी एक अथवा दोन शेडस् उपलब्ध करुन देण्यात यावेत. पावसाळ्यात अशा शेडसमध्ये काही खेळाच्या सुविधा उपलब्ध करुन देता येऊ शकतील. अशा शेडसमध्ये खेळाचे साहित्य ठेवण्यासाठी, मल्टीजिमसाठी प्रशिक्षकांसाठी कार्यालय तसेच प्रसाधन गृह [मुले, मुली ... स्वतंत्र] याची व्यवस्था करता येऊ शकेल.

४.३ प्रबोधिनी प्राचार्य

प्रबोधिनी प्राचार्य यांच्याकडे संपूर्ण व्यवस्थापनाची जबाबदारी देण्यात यावी. या पदासाठी निवृत्त लष्करी अधिकारी अथवा अर्जुन ॲवार्ड विजेत्या खेळाडूंना रु. ७,०००/- दरमहा मानधनावर नेमण्यात येईल. प्रबोधिनी प्राचार्यांना त्यांच्या दर्जाला अनुकूल अशी वाहन व निवास व्यवस्था देण्यात येईल. प्राचार्यांच्या कार्यालयांतर्गत एक स्टेनो, वरिष्ठ लिपीक व इतर दोन लिपीक व दोन चतुर्थश्रेणी कर्मचारी व एक वाहन चालक यांची नेमणूक करण्यात येईल.

४.४ क्रीडा प्रशिक्षक

निवड केलेल्या खेळाडूस केंद्रबिंदू मानून सुरुवातीपासून उत्कृष्ट प्रशिक्षकाद्वारे त्यावर खेळाविषयक संस्कार घडविणे अत्यावश्यक असल्यामुळे त्या त्या क्षेत्रातील नामवंत प्रशिक्षकांना क्रीडा प्रशिक्षक म्हणून मानधनावर नेमणूक देण्यात येईल. मानद प्रशिक्षकांच्या मानधनासाठी सर्वसाधारणपणे पुढीलप्रमाणे क्रीडाश्रेणी असतील.

| | | दरमहा मानधन | दि. २०/१०/२००६ च्या शा.नि. दरमहा मानधन |
|---|---|---|---|
| अ] प्रथमश्रेणी | : | रु. ६,०००/- | ८,०००/- |
| ब] द्वितीयश्रेणी | : | रु. ४,०००/- | ६,०००/- |
| क] तृतीयश्रेणी | : | रु. १,५००/- | ३,०००/- |

त्यापैकी शक्य तो प्रथम श्रेणीतील मानद प्रशिक्षक प्रबोधिनीवर नियुक्त करण्यात येतील. क्रीडा प्रशिक्षकांची निवड करतांना क्रीडा प्रकारानुसार करण्यात येईल व प्रबोधिनीला नेमून दिलेल्या खेळासाठी त्या त्या खेळातील किमान एक प्रशिक्षक नियुक्त केला जाईल. याशिवाय मुलभूत सर्व खेळ प्रकारांसाठी एक प्रशिक्षक नियुक्त करण्यात येईल. प्रशिक्षकाची सेवा रोज किमान ५ तास [सकाळ व सायंकाळ मिळून] अपेक्षित असल्यामुळे तसेच प्रशिक्षक हे मानधनावर असल्यामुळे इतर

Scanned by CamScanner

फावल्या वेळात त्यांना स्वतःचा व्यवसाय अथवा नोकरी करण्यात आडकाठी करण्यात येऊ नये. प्रशिक्षक नेमतांना सुरुवातीला किमान एक वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी ठेवण्यात येईल व प्रशिक्षकांशी मानधनाबाबत करार करतांना तो जास्तीत जास्त ५ वर्षांचा असेल. क्रीडा प्रशिक्षकांनी प्रबोधिनीच्या कामा व्यतिरिक्त लहान खेळाडू मुला-मुलींमधील सुप्त क्रीडा गुण हेरण्याच्या टॅलेन्ट सर्च ] दृष्टीने भोवतालच्या भागात जाऊन मुले हेरण्याचे काम करावयाचे आहे. भोवतालच्या भागात क्रीडा वातावरण निर्मितीमध्ये त्यांचा महत्वाचा वाटा राहील.

४.५ इतर कर्मचारी

प्रथमश्रेणी मानद प्रशिक्षकाला मदतनीस म्हणून प्रत्येक खेळासाठी एक तृतीयश्रेणी प्रशिक्षक मदतनीस [सहाय्यक मार्गदर्शक] म्हणून नेमण्यात यावा व आवश्यकतेनुसार एक किंवा दोन ग्राउंडमनची मानधनावर नेमणूक करण्यात येईल. सफाई कामगार, पहारेकरी, धोबी, तसेच भोजन व्यवस्था यासाठी विहित नियमानुसार कंत्राटपध्दतीच अवलंब करण्यात येईल.

५. स्पर्धा

प्रशिक्षणार्थींनि शालेय क्रीडा स्पर्धा व राज्य संघटनांकडून आयोजित केल्या जाणा-या नेहमीच्या स्पर्धांमध्ये सहभागी होणे आवश्यक राहील.

६. प्रबोधिनीची कर्तव्ये व जबाबदा-या

[१] मध्यवर्ती केंद्राने दिलेल्या मार्गदर्शनपर सूचनांप्रमाणे प्रशिक्षणार्थींची निवड व प्रशिक्षण देणे,

[२] प्रशिक्षणार्थींची शालेय शिक्षणाची व्यवस्था करणे

[३] प्रशिक्षणार्थींच्या क्रीडा विषयक व शालेय प्रगतीवर लक्ष ठेवणे तसेच विवक्षित प्रगती न दाखविणा-या प्रशिक्षणार्थींच्या ऐवजी मध्यवर्ती केंद्राच्या सल्ल्याने नवीन प्रशिक्षणार्थींची निवड करणे.

[४] प्रशिक्षणार्थींच्या निवास, भोजन, वैद्यकिय मदत, क्रीडा प्रशिक्षण, सराव व स्पर्धा यावर देखरेख व आयोजन करणे.

[५] योग, मानसोपचार, क्रीडा वैद्यकशास्त्र, आहारशास्त्र व अशा प्रशिक्षणाला पुरक असणा-या सोयी मध्यवर्ती केंद्राच्या सल्ल्याने पुरविणे.

Scanned by CamScanner

१९९८ व २००२ च्या एशियाड स्पर्धांच्या अल्पकालीन योजनां संदर्भात उपलब्ध खेळाडूंमधून पदक विजेते निर्माण करण्यासाठी प्रशिक्षण देणे.

प्रबोधिनीच्या भौगोलिक क्षेत्रात येणाऱ्या जिल्ह्यांमध्ये तालुक्याच्या ठिकाणी जे क्रीडा कार्य चालू असेल त्याचे सर्वेक्षण करून बालवयातील मुला-मुलींमधील उपजत क्रीडा गुण हेरुन त्यांना सर्वतोपरी मार्गदर्शन आणि उत्तेजन देणे व सध्या अस्तित्वात असलेल्या क्रीडा [illegible] संपर्क ठेवणे व त्यांच्याजवळ असलेल्या अनुभवाचा , साधनसामुग्रीचा आणि क्रीडा प्रशिक्षकांचा आपल्या विभागासाठी जास्तीत जास्त उपयोग करुन घेणे. प्रबोधिनीचे हे काम विस्तार सेवेसारखे म्हणजे एक्स्टेन्शन सर्व्हिससारखे असेल.

Scanned by CamScanner

मध्यवर्ती केंद्र

७.१ क्रीडा प्रबोधिनीवर नियंत्रण ठेवणे, मार्गदर्शन करणे, शासनाच्या क्रीडा धोरणाची अंमलबजावणी करणे तसेच क्रीडा धोरणाच्या सर्वांगीण विकासासाठी सल्ला देणे, वेळोवेळी अहवाल देणे. इ. उद्दिष्टांसाठी एक राज्यस्तरीय मध्यवर्ती संस्था पुणे येथे स्थापन करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

७.२. मध्यवर्ती केंद्राचे केंद्र प्रमुख म्हणून क्रीडा विभागाच्या विविध योजनांचे ज्ञान तसेच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा विषयी संपूर्ण माहिती असलेल्या तसेच प्रशासकीय अनुभव असलेल्या सुयोग्य आणि सक्षम अशा निवृत्त सनदी अधिकाऱ्याची या पदावर मानद केंद्र प्रमुख म्हणून नेमणूक करण्यात येईल आणि त्यासाठी त्यांचे दरमहा मानधन रु.१०,०००/- असेल.

७.३. हे मध्यवर्ती केंद्र निवासी राहील आणि त्यात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करण्याची महाराष्ट्राला ज्या खेळात संधी असेल अशा निवडक खेळांची सोय केली जाईल. कॅच देम यंग या संकल्पनेत समाविष्ट केलेल्या एकूण ५ टप्प्यापैकी पहिले ३ टप्पे पार करुन अंतिम दोन टप्प्यात समाविष्ट होणाऱ्या खेळाडूंप्रमाणे ही संस्था मर्यादीत राहील.

७.४. मध्यवर्ती केंद्रात प्रशिक्षणाला प्रयोगशाळेचीही जोड असेल आणि त्यासाठी क्रीडा वैद्यकशास्त्र, क्रीडा मानसशास्त्र, भौतिकोपचार [फिजिओथेरपी], मसाज, योगविद्या इ. बाबतचे अद्ययावत प्रशिक्षण, तंत्र आणि सहाय्य खेळाडूंना उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याशिवाय दृकश्राव्य माध्यमांचा देखील अधिकाधिक वापर करण्यात येईल.

७.५ अन्य राष्ट्रातून नावाजलेल्या प्रशिक्षकांना आमंत्रित करुन प्रशिक्षक आणि खेळाडू या दोघांसाठी चर्चासत्रे, प्रात्यक्षिके, दृकश्राव्य माध्यमांचा वापर करुन प्रशिक्षणाची उपलब्धता करुन देणे हे मध्यवर्ती केंद्राचे महत्वाचे कार्य राहील.

कृ.मा.प.

७.६ नियंत्रण प्रशासकीय दृष्ट्या मध्यवर्ती केंद्र हे क्रीडा प्रबोधिनींवर संपूर्ण नियंत्रण ठेवणारी संस्था असेल, त्यांच्या कार्याचे स्वरूप खालीलप्रमाणे असेल:

१) राज्यातील सर्व क्रीडा प्रबोधिनींवर नियंत्रण व देखरेख ठेवणे, वेळोवेळी त्यांच्या कार्याचे मुल्यमापन करून आवश्यक तेथे फेरबदल सुचविणे.

२) क्रीडा प्रबोधिनीसाठी प्राचार्य, प्रशिक्षक व इतर कर्मचारी वर्गाची नेमणूक करणे.

३) प्रशिक्षणार्थींच्या निवडीबाबत मार्गदर्शन पध्दती ठरवून, निवड समिती स्थापन करणे.

४) प्रशिक्षणार्थींच्या प्रशिक्षणाचे वेळापत्रक, सरावासाठी कार्यपध्दती व स्पर्धांचे आयोजन यावर देखरेख ठेवणे, याबाबत संबंधित खेळाच्या प्रमुख प्रशिक्षकांचा सल्ला आवश्यक असेल.

५) क्रीडा विषयक आणि / किंवा शालेय अभ्यासक्रमांत प्रगती न दाखविणाऱ्या प्रबोधिनीतील खेळाडूंऐवजी नवीन प्रशिक्षणार्थींची निवड व प्रशिक्षण याबाबत प्रबोधिनी प्रमुखांना मार्गदर्शन करणे.

६) प्रबोधिनीतील व मध्यवर्ती केंद्रातील प्रशिक्षणाचे टप्पे पूर्ण करणाऱ्या खेळाडूंना सहभागाचे प्रमाणपत्र देणे.

७.७: <u>प्रशिक्षणार्थींची निवड</u> :- लहान वयात कळ दिसे पांग या सूत्रानुसार [लहान वयातच] अंगी असलेले क्रीडा विषयक उपजत गुण हेरून प्रशिक्षण देण्याचे कार्य क्रीडा प्रबोधिनी व मध्यवर्ती केंद्रामार्फत साधले जाईल. प्रशिक्षणार्थींची निवड करतांना भारतीय क्रीडा प्राधिकरणाने लहान वयातच अंगी असलेले क्रीडा विषयक उपजत गुण हेरण्यासाठी तयार केलेली "बॅटरी ऑफ टेस्ट" [निवड चाचण्या] ही पध्दत अवलंबिण्यांत येईल.

Scanned by CamScanner

परिशिष्ट "क"

| अ.क्र. १. | शिफारस २. | संबंधित विभाग ३. |
| --- | --- | --- |
| १. | व्यावसायिक प्रशिक्षणाचे पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे प्रवेश देतांना राष्ट्रीय स्तरावरील पदक विजेते [सुवर्ण/रौप्य/ब्रॉंझ] खेळाडूंसाठी केवळ अधिकचे गुण न देता अशा खेळाडू विद्यार्थ्यांना त्या त्या प्रशिक्षणासाठी पात्रता एवढे गुण असतील तर थेट प्रवेश देण्यांत यावा. | उच्च व तंत्र शिक्षण विभाग |
| २. | विद्यापिठ अनुदान आयोगाने खेळाडूंना द्यावयाच्या सवलतींबाबत पाठविलेल्या मार्गदर्शनपर सूचनांना अनुरुप अशा सूचना शालेय शिक्षण विभागाने प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाच्या बाबतीतही अंमलात आणाव्यात. | शालेय शिक्षण विभाग |
| | राज्य राखीव पोलीस दलात राष्ट्रीय पदक विजेते व इतर खेळाडूंसाठी उपपोलीस निरीक्षकांच्या तसेच कॉन्स्टेबल तसेच तत्सम पदांच्या ५% जागा राखून ठेवण्यांत याव्यात. | गृह विभाग |
| | श्री. शिवछत्रपती तसेच दादोजी कोंडदेव, अर्जुन व द्रोणाचार्य पुरस्कार विजेत्या खेळाडूंना राज्य/राष्ट्रीय समारंभाच्यावेळी गौरवाने आमंत्रित करुन त्यांच्यासाठी वेगळी आसन व्यवस्था ठेवण्यांत यावी. | सामान्य प्रशासन विभाग |
| | क्रीडा साहुग्री निर्मिती अभ्यासक्रमाची सोय अभियांत्रिकी संस्थांमधून करण्यांत यावी. | तंत्र शिक्षण विभाग |
| | शारिरीक शिक्षणावरील दुहेरी नियंत्रण काढून टाकण्यांत यावे व शारिरीक शिक्षण हा विषय संपूर्णपणे शिक्षण विभागाकडे सुपूर्द करण्यांत यावा. | उच्च व तंत्र शिक्षण विभाग |
| | शारिरीक शिक्षण अत्यावश्यक करण्याबाबतचे तत्व प्रत्यक्षात कृतीत आणणे आवश्यक आहे. | शालेय शिक्षण विभाग |
| | शारिरीक शिक्षणाच्या पदवीधारकांना इतर अभ्यासक्रमांच्या पदवीधारकांप्रमाणे समान दर्जा देण्यांत यावा. | उच्च व तंत्र शिक्षण विभाग |

..२.

| १. | २. | ३. |
|---|---|---|
| ९. | २५० विद्यार्थ्यांमागे १ शारिरीक शिक्षक हे तत्व प्राथमिक शाळांच्या बाबतीतही लागू करण्यांत यावे. | शालेय शिक्षण विभाग |
| १०. | क्रीडा क्षेत्रासाठी खाजगी उद्योजकांचे सहाय्य मोठ्या प्रमाणावर घेण्यांत यावे. | उद्योग विभाग. |
| ११. | क्रीडा क्षेत्रासाठी आर्थिकदृष्टया सक्षम महानगर-पालिकेचे सहकार्य घेण्यांत यावे. | नगर विकास विभाग |
| १२. | राज्य शासनाच्या अंतर्गत असणाऱ्या आर्थिकदृष्टया सक्षम महामंडळांनी खेळ अथवा संघ दत्तक घेण्याची योजना राबविण्यासाठी पुढे यावे. | उद्योग व उर्जा विभाग<br>परिवहन विभाग<br>सहकार विभाग. |
| १३. | केंद्र शासनाने क्रीडा क्षेत्रामध्ये गुंतवणूक करण्यासाठी देऊ केलेल्या कर सवलतींचा लाभ राज्यातील उद्योजकांनी मोठ्या प्रमाणात घ्यावा. | उद्योग विभाग. |

Scanned by CamScanner